MHNS140004252026

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३५/२०२६
अरुण गणपत खांदवे वि.
महाराष्ट्र शासन - पोलीस निरीक्षक,
दिंडोरी पोलीस स्टेशन.

## निशाणी क्र. १ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज पोलीस ठाणे दिंडोरी यांनी गु.र.क्र.५०/२०२६, भारतीय न्याय संहीता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१६(३), ३१७(२), ३(५) मध्ये जप्त केलेला विवो कपंनीचा V-27 मॉडेलचा मोबाईल व ५००/- रुपये दराच्या १४७ नोटा एकुण ७३,५००/- रुपये (यापुढे सोईकरिता 'जप्त मोबाईल व जप्त रक्कम' असा उल्लेख) चा अंतरिम ताबा मिळावा याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, दिंडोरी पोलीस स्टेशनकडील गु.र.क्र.५०/२०२६ मध्ये सामनेवाले यांनी अर्जदाराचे मालकीचा विवो कपंनीचा V-27 मॉडेलचा मोबाईल ज्याचा ८६६६७००६५६५६३८४ आय.एम.ई.आय. असलेला मोबाईल व ५००/- रुपये दराच्या १४७ नोटा असे एकुण ७३,५००/- रुपये जप्त केलेला आहे. प्रस्तुत जप्त केलेला मोबाईल व जप्त रक्कम ही त्यांच्या मालकीची आहे. पोलीसांनी प्रस्तुत मोबाईल व रक्कम जप्त केल्यापासून ती पोलीस ठाण्यात जप्त आहे. त्यामुळे त्याचे नुकसान होण्याची अथवा चोरीस जाण्याचा संभव आहे. सबब, सदर जप्त मोबाईल व जप्त रकमेचा अंतरिम ताबा मिळण्याकरिता आदेश व्हावा अशी विनंती अर्जदाराने केलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. तपासी अंमलदार आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे पाहिले. तपासी अंमलदार यांनी प्रस्तुत अर्जाकामी त्यांचे म्हणणे दिले असुन आरोपीने जप्त मोबाईलचा वापर गुन्हा करण्यासाठी केलेला असुन जप्त रक्कमबाबत आरोपीस विचारणा केली असता कोणतेही समर्थक उत्तर न देता उडवाउडवीची उत्तर देत असुन जप्त मोबाईल व जप्त रक्कम परत केल्यास त्याचा वापर

तो पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्ह्यात करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, जप्त मोबाईल व जप्त रक्कम परत करण्यास हरकत घेतली आहे.

**०४.** विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे लेखी म्हणणे सदर अर्जाचे निशाणी क्र.१ वर सादर केले. त्यांनी नमुद जप्त मोबाईल व जप्त रक्कम अर्जदारास परत देण्यास हरकत घेतली आहे.

**०५.** अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराने त्यांच्या कथनाच्या पुष्ठर्थ त्याचे स्वतःचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.४ वर, नि.क्र.३ लगत एफ.आय.आर ची छायांकित प्रत, सदर मोबाईल खरेदी केल्याचे बिलाची प्रत, अर्जदाराचे आधारकार्डची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केले आहेत. सदर दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, जप्त मोबाईल अर्जदाराचे नावे खरेदी आहे. तसेच तपासी अंमलदार यांचे म्हणणे पाहता सदर जप्त करण्यात आलेली रक्कम आरोपी/अर्जदाराकडुन जप्त करण्यात आलेली आहे. अर्जदाराने मोबाईलबाबत प्रथमदर्शनी मालकी दर्शविणारा पुरावा आणलेला आहे. त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणीही व्यक्ती सदर मोबाईलवर व जप्त रक्कमेवर हक्क सांगत नाही. तसेच सदर मोबाईल मधील डाटा रिकव्हर करण्यासाठी दिला आहे व त्यासाठी सदर मोबाईलची गरज आहे असे तपासी अंमलदार यांचे म्हणणे नाही.

**०६.** मा. सर्वोच्च न्यायालयाने <u>Sundarlal Ambalal Desai versus State of Gujarat (AIR 2003 S C 628),</u> मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत अर्जदार हा सदर मोबाईलचा व जप्त रक्कमेचा ताबा मिळण्यास पात्र आहे, त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सदर मुद्देमालावर हक्क सांगणारी व्यक्ती समोर आली नाही. सबब अर्जदार प्रस्तुत अंतरिम ताबा मिळण्यास पात्र ठरतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दिंडोरी पोलीस स्टेशनकडील गु.र.क्र.५०/२०२६ मध्ये सामनेवाले यांनी जप्त

केलेला विवो कपंनीचा V-27 मॉडेलचा मोबाईल व ५००/- रुपये दराच्या १४७ नोटा एकुण ७३,५००/- रुपये चा अंतरिम ताबा अर्जदारास द्यावा. त्याकरिता अर्जदाराने रुपये ५०० च्या मुद्रांक शुल्कावर १,१०,०००/- (रुपये एक लाख दहा हजार फक्त) रुपये किमतीचा इंडेमनिटी बॉण्ड भरुन दयावा.

३. प्रस्तुत गुन्हयाचे तपासी अंमलदार यांना असे आदेश देण्यात येतात की, सदर मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देताना त्याची छायाचित्रे आणि पंचनामा तयार करावा. जप्त रक्कमेचा पंचनामा तयार करतांना नोटांचे नंबर व किती रुपयांची नोट आहे हे नमुद करावे आणि सदर पंचनामा मुळ खटल्याकामी दोषारोपपत्र दाखल करताना त्यासमवेत दाखल करावे.

४. अर्जदारास असेही आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत खटल्याचा निकाल होईपावेतो अर्जदाराने सदर मोबाईल कोणासही दान, गहाण, विक्री देवु नये किंवा नष्ट करुन नये आणि इतर कोणत्याही स्वरुपात बदल होईल अशी कोणतीही कृती या न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय करु नये.

५. संबंधीतांना सदर आदेशाबाबतचे पत्र अग्रेषीत करण्यात यावे.

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2026.03.16 17:28:39 +0530

दिनांक १६/०३/२०२६

( एस. सी. निर्मळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दिंडोरी.